Literacy for a Billion

Movie: Agnipariksha
Year: 2010

Song: Nau Divsanchi Navraat
Lyricist:

नऊ दिवसांची नवरात
नऊ दिवसांच्या नऊ माळा
माझ्या भवती पहारा
दुःख सांगू मी कुणाला
नऊ दिवसांची नवरात
नऊ दिवसांच्या नऊ माळा
माझ्या भवती पहारा
दुःख सांगू मी कुणाला
संबळ तुणतुणं
टाळ वाजती जोरात
देवी जाण तू भक्तांच्या
काय चाललं मनात
उदो उदो उदो उदो
उदो उदो उदो...

एक एक माळ तुझी
आई रोज वाढवीन
सांगे मनातलं तुला ही सासुरवाशिण
आई अंबाबाई वाजे
तुझ्यापुढे झांझ टाळ
स्वार्थी लोकांनी गं सारा
आता सोडलायं ताळ
पैशांची सारी मस्ती
आहे त्यांच्या डोळ्यावर
सांभाळ तू गं आई
आता सोसवेना भार
एक आहे तुझा भरोसा
शरण आले देवी तुला
माझ्या भवती पहारा
दुःख सांगू मी कुणाला
संबळ तुणतुणं
टाळ वाजती जोरात
देवी जाण तू भक्तांच्या
काय चाललं मनात
उदो उदो उदो उदो
उदो उदो उदो...

देवी तुझ्या आसपास
किती वाढते आरास
रोज माझ्या गळ्यापाशी
बघ आवळतो फास
आपल्याच माणसांचा
आई होतो आहे जाच
ओल्या डोळ्यातलं माझ्या
आज सारं सारं वाच
विसरली गं सारी
लोक जिव्हाळ्याचं नातं
अंधार झाला फार
उजाडू दे पहाट
बाळ हसू दे पदरी
झुलू दे अंगणी झुला
माझ्या भवती पहारा
दुःख सांगू मी कुणाला
संबळ तुणतुणं
टाळ वाजती जोरात
देवी जाण तू भक्तांच्या
काय चाललं मनात
उदो उदो उदो उदो

Literacy for a Billion

उदो उदो उदो...
आदिमाया असं घे
कालिकेचे रूप भारी
दृष्ट पापीयां पासून
साऱ्या जगताला तारी
आई शक्ती दे युक्ती दे
मी आहे बंदीवान
नाव तुझे घेऊनिया
सीमोलंघन करीन
उदो उदो उदो उदो
उदो उदो उदो...

वरदायिनी भगवती
तू भक्तांची संजिवनी
मंगल सिंहवाहिनी
तेजस्वी तू मोहिनी
दीनोद्धार दे अंबिके
तुज लक्षावधी वंदने
लक्षावधी वंदने
लक्षावधी वंदने
उदो उदो उदो उदो
उदो उदो उदो...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*